कळंबा बोडखे येथे दारू वाहतुकीवर LCB वाशीमची कारवाई; ३ लाखाचा मुद्देमाल जप्त. दि. १३/०४/२०

लोकमत

# दारू वाहतूकीवर कारवाई; ३ लाखांचा मुद्देमाल जप्त

## कळंबा बोडखे येथील घटना: एका विरुद्ध गुन्हा दाखल

लोकमत न्युज नेटवर्क

**आसेगाव:** एका कारमधून नेण्यात येत असलेली बिदेशी दारू आणि बिअर स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी मंगरुळपीर तालुक्यातील कळंबा बोडखे येथे शनिवारी दुपारच्या सुमारास पकडली. या कारवाईत बिदेशी दारू आणि बिअरसह ३ लाख ७ हजार रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त करीत कारचालक नितिन देवगिरीकर रा. मंगरुळपीर याच्याविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

कोरोना संसर्गाच्या पृष्ठभुमीवर शासनाने लॉकडाऊन जारी करताना मद्यविक्री बंद केली आहे. अशातही एका कारमधून दारूची वाहतूक करण्यात येत असल्याची माहिती मंगरुळपीर-वाशिम दरम्यान पेट्रोलिंग करीत असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांना रविवारी मिळाली. त्यावरुन पोलिसांनी मंगरुळपीर ते धानोरा खु.दरम्यान येणाऱ्या कळंबा बोडखे येथे नाकाबंदी केली. यावेळी पांढऱ्या रंगाच्या एका कारमध्ये विदेशी दारूसह बिअरची वाहतूक केली जात असल्याचे आढळून आले. या कारवाईत पोलिसांनी विदेशी दारूसह बिअरच्या मिळून ५२ बाटल्यांसह कार मिळून ३ लाख ७ हजार रुपयांचा ऐवज जप्त करीत कारचालक नितिन देवगिरीकर याच्यावर कलम १८८, २७०, २७१, २९०, २९१, सहकलम ६५ अ महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक भगवान पायघन, पो.कॉ. सुनिल पवार,अमोल इंगोले, प्रेम राठोड, बालाजी बर्वे, श्याम इंगळे यांच्या पथकाने केली.



जप्त केलेल्या मुद्देमालासह स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस पथक